# <u>प्रकरण- २ (मॅन्युअल -एक)</u>

## कार्यालयाचा तपशील, कामे आणि कर्तव्ये

उप प्रमुख लेखापाल (आस्था.२) या विभागाच्या नियंत्रणाखाली खालील उपविभाग येतात.

१) वेतन निश्चिती कक्ष

२) वेतन सुधारणा कक्ष

३) अभियांत्रिकी विभागातील आस्थापनाविषयक प्रस्ताव (एफईई)

४) आरोग्य व अभियांत्रिकी खात्याव्यतिरिक्त इतर सर्व खात्यातील आस्थापनाविषयक प ्रस्ताव (एफईएम)

### अ) वेतन निश्चिती उपविभागाची कार्ये

१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार वेतन घेणा-या कर्मचा-यांच्या वेतन निश्चिती प्रपत्रांची पडताळणी करणे व वेतन सुधारणेच्यावेळी निर्माण झालेली वेतन विसंगतीची प्रकरणे हाताळणे.

२) मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीत सुधारणा करणे

३) निवृत्ती वेतन नियमामध्ये सुधारणा करणे

४) सानुग्रह निवृत्ती वेतन व सानुग्रह कुटुंब निवृत्ती वेतन अनुज्ञेय करणे

५) महागाई भत्त्यामध्ये होणारी वाढ/घट

अ) महानगरपालिका विद्यमान कर्मचारी

ब) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार वेतन घेणारे कर्मचारी

६) निवृत्ती वेतनावरील महागाई सहाय्यामध्ये होणारी वाढ/घट

७) निवृत्ती वेतनाचे मूल्य निर्धारण

८) कर्मचारी संघटनांकडून आलेली निवेदने

९) बाहेरील संघटनांकडून आलेले संदर्भ / निवेदने

१०) केंद्र व राज्य शासनाकडून येणारे कामगार विषयक कायद्यासंबंधी नवीन बदल व इतर पूरक अधिसूचना

११) महानगरपालिका कर्मचा-यांना देण्यात येणा-या अतिरिक्त वेतनवाढी

### ब) वेतन सुधारणा उपविभागाची कार्ये

१) महानगरपालिका कर्मचा-यांची सर्वसाधारण वेतनश्रेणी सुधारणा, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, रजा प्रवास भत्ता, विशेष वेतन आणि भत्ते इत्यादीमध्ये सुधारणा करणे, लवाद नेमणे, वेतन, भत्ते, पदनाम, कर्मचा-यांच्या मागण्यांची निवेदने इ. बाबतचा अभिनिर्णय घेणे.

### क) एफईई/एफईएम उपविभागांची कार्ये

१) नेमणूकांचे सेवासातत्य राखण्याबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे.

२) परिषदांना उपस्थित राहण्याबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे.

३) शैक्षणिक कामासाठी प्रतिनियुक्तीबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे.

४) परदेशात नोकरीसाठी प्रतिनियुक्ताबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे.

५) अतिकालिक भत्त्याच्या विवरणपत्राची पडताळणी करणे.

६) मुंबई महापालिका सेवा नियमावली १९८९ मधील नियमांचा अन्वयार्थ लावून अंमलात आणणे/मुंबई महानगरपालिका सेवा, वर्तणूक आणि शिस्त नियमावलीचा अन्वयार्थ लावणे.

७) मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ७८, ८०(अ), ८४(२)(बी) अन्वये स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या मसुदापत्राची पडताळणी करणे.

८) महानगरपालिका कर्मचा-यांना आणि अधिका-यांना मानधन देण्याबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे.

९) अनुकंपा निवृत्ती वेतन आणि नुकसान भरपाई निवृत्ती वेतन देण्याबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे.

१०) विशेष कामगिरी केल्याबद्दल अतिरिक्त वेतनवाढी देणे

११) उपरोक्त विषयासंदर्भातील कर्मचा-यांची गा-हाणी इत्यादीविषयक प्रस्ताव हाताळणे. उदा. निलंबन, सेवेतून काढून टाकणे, करार पध्दतीवरील सेवा, प्रतिनियुक्ती, महानगरपालिका कर्मचारी ५.७.१९९१ पूर्वी बेपत्ता झाला असल्यास त्याबाबतचे कुटुंब निवृत्ती वेतन आणि मृत्यू-नि-सेवा उपदान इत्यादी प्रकरणी.